प्रिय साथी,

स. न. वि. वि.

औषधांच्या किंमतीबाबतचा माझा २० नोव्हेंबरच्या 'सकाळ' मधील लेख आपण कदाचित वाचला असेल. मूळ शीर्षकासह तो सोबत जोडला आहे.

या लेखाला प्रतिसाद म्हणून बालगंधर्व रंगमंदिरासमोरील 'राठी मेडिकल्स' चे राठी मला भेटले. जनरिक नावाखाली मिळणारी चांगल्या कंपन्यांची औषधे पुण्यात २०-२५ दुकानात विक्रीला ठेवायची मी व्यवस्था करु शकेन असे ते म्हणाले. या जनरिक औषधांच्या पाकिटावर MRP कितीही फुगवून लिहिली असली तरी खरेदी किंमतीवर विशिष्ट मार्जिन घेऊन या MRP पेक्षा खूप कमी किंमतीलाही औषधे विकायची त्यांची तयारी आहे. थोडे सामाजिक कार्य, थोडा व्यावसायिक दृष्टिकोन (नवी गि-हाईके मिळवणे की जी इतर औषधे इ. त्याच दुकानातून घेतील) याचे मिश्रण या ऑफर मागे आहे असे वाटते. या त्यांच्या ऑफरबाबत वर्तमानपत्रात लिहिणे, कोणते औषध कोणत्या किंमतीत मिळेल याचा तक्ता त्यात छापणे व या तक्त्याप्रमाणे औषधे विकणा-या दुकानांची नावे, पत्ते या लेखात छापणे हा एक मार्ग झाला. पण अशा प्रकारच्या व्यवसायाभिमुख मजकुराला, विशेषतः दुकानांच्या नावाला पेपर-प्रसिद्धी मिळेल की नाही हे माहित नाही. त्यामुळे पत्रक छापून मोठ्या प्रमाणावर (५० हजार, १ लाख पत्रके) पुण्यात वाटणे असा कार्यक्रम आपण घेऊ शकतो का? त्याचा निम्मा किंवा पूर्ण खर्च 'त्या' दुकानांना करायला सांगता येईल.

काही डॉक्टरांचे या कामात सहकार्य मिळेल का ते पहायला हवे. त्यासाठी डॉक्टरांच्या IMA व संघटनांच्या मार्फत आवाहन करता येईल की हे पत्रक त्यांनी आपल्या दवाखान्यात ठेवावे. IMA चे मासिक दरमहा १५०० डॉक्टरांकडे जाते. पण त्या शिवाय आपण आपल्या जवळच्या डॉक्टरांना हे पत्रक देण्याची मोहिम करु शकतो का? दहा टक्के डॉक्टरांनी सहकार्य करायचे म्हटले तरी चांगली सुरुवात होईल.

खाजगी इस्पितळात रुग्णांच्या मानवी हक्कांचे पालन करायला लावणारी नियमावली येईल तेव्हा येईल. पण त्यासाठी न थांबता त्यातील निदान काही हक्कांबाबत डॉक्टर आपणहून अंमलबजावणी करायला तयार होतील का असे आपण इंडियन मेडिकल असोसिएशनला विचारले होते. त्याचा पाठपुरवठाही केला होता. ते पत्र सोबत जोडले आहे. डॉ. संजय गुप्ते यांच्या हॉस्पिटलमध्ये याबाबत एक बैठक घ्यावी असा प्रस्ताव आहे. (३, ७, किंवा १७ डिसेंबर रोजी दुपारी)

वरील मुद्यांबाबत काय वाटते? काही सूचना आहे का? IMA सोबत जेव्हा बैठक असेल त्याच्या आधी २ तास आपण भेटून ठोसपणे या बैठकीत काय करायचे ते ठरवता येईल. किंवा आपण आधी एखाद्या दिवशीही भेटू शकू. याबाबतही आपले मत कळवावे.

आपण जरुर प्रतिसाद द्याल अशी आशा आहे.

आपला

A Phadke

डॉ.अनंत फडके